राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ - २०२/२०२१ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| संजय सुदाम पडवकर | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मावळ, ता. मावळ, जि. पुणे | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मावळ, ता. मावळ, जि. पुणे |

**तक्रार अर्ज सुनावणी दि.४/९/२०२४**

तक्रारदार यांनी दि.०२/०९/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

आयोजीत सुनावणीस तक्रारदार हजर होते, तर जन माहिती अधिकारी गैरहजर होते.

तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.

"आयोगाने द्वितीय अपिल क्र.१११६/२०१७ मध्ये दि.०९/०४/२०१९२ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करताना जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मावळ ता.मावळ जिल्हा पुणे यांनी विलंबाने अपूर्ण माहिती दिली."

सुनावणीचेवेळी तक्रारदार यांनी सुचित केले की, जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मावळ ता.मावळ जिल्हा पुणे यांनी विलंबाने अपूर्ण माहिती दिली, तशी तक्रार करुन संबंधितांवर दंडात्मक स्वरुपाची कारवाई करावी अशी मागणी केली आहे.

आयोगाकडील उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते की, आयोगाने द्वितीय अपिल क्र.१११६/ २०१७ मध्ये दि.०९/०४/२०१९२ रोजी दिलेल्या आदेशात दि.३०/७/२०१९ पर्यंत माहिती देण्याचे आदेश पारीत केले होते. जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मावळ ता.मावळ जिल्हा पुणे श्री.बी.बी.दरवडे यांनी आयोगाच्या आदेशानंतर दोन वर्षानंतर दि.१८/३/२०२१ रोजी माहिती दिली होती. यावरुन स्पष्ट होते की, जन माहिती अधिकारी यांनी आदेशाची अंमलबजावणी विहित कालावधीत

केली नाही, आणि फार विलंबाने अपूर्ण माहिती दिली. त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असल्याने ते दंडात्मक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात.

आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मावळ ता.मावळ जिल्हा पुणे श्री.बी.बी.दरवडे गैरहजर आहेत. सबब, आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश.**

१. अर्जदाराचा तक्रार अर्ज मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मावळ ता.मावळ जिल्हा पुणे श्री.बी.बी.दरवडे यांनी आयोग आदेशाची अंमलबजावणी करतान फार विलंबाने अपूर्ण माहिती देऊन त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असल्याने त्याचेवर विरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) नुसार रुपये २५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये , याबाबतचा खुलासा आयोग आदेश प्राप्ती पासून सात दिवसात आयोगास सादर करावा, अन्यथा आयोगाच्या आदेशाच्या उल्लंघनाची कृती दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

( समीर सहाय )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. **तक्रार क्र. रामाआ/२०२/२०२१/पुणे-** दिनांक१२/९ /२०२४/18/9/2024

प्रतिलिपी-माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित-

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे.

सदरचा आदेश संबंधितास बजावून त्याची पोच आयोगास सादर करावी.